*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ९३२/२०२१/अहमदनगर

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विनायक ऊर्फ गणेश विलास ठाकूर,<br>रा. ६५४, तोफखाना, ठाकून गल्ली, अहमदनगर,<br>ता. जि.अहमदनगर. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, अहमदनगर,<br>ता. जि. अहमदनगर. | तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, अहमदनगर,<br>ता. जि. अहमदनगर. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक – १६/०१/२०२४**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २९/१२/२०२० | २९/१२/२०२० | ---- | ०३/०२/२०२१ | ०३/०२/२०२१ | --- |

अपिलार्थी यांनी दि. १९/०३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे व प्रथम अपील अधिकारी यांनी सुनावणीच न घेतल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून अन्य सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ०३/०३/२०२० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

मला अपील क्रमांक ६/२०२० दि. ०३/०३/२०२० च्या निर्णय रोजनामा अश्या सर्व कागदपत्रांच्या नकला हव्या आहेत. वरील नकला राज्य माहिती आयोग खंडपीठ, नाशिक यांच्याकडे सादर केलेल्या अपिला संदर्भात लागत आहेत. सदरील माहिती झेरॉक्स स्वरुपात देण्यात यावी. व त्या प्रत्येक पानाची २ रु. प्रमाणे फि भरण्यास तयार आहे.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तीवादावरून असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अहमदनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि. २९/१२/२०२० रोजीच्या माहिती अर्जावर कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, अहमदनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि. ०३/०२/२०२१ रोजी दाखल केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३) सुनावणीदरम्याचा युक्तीवाद व प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. जि. अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९/१२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता.जि.अहमदनगर, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तात्काळ आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. अहमदनगर यांना आदेशित करण्यात येत की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि. १२/१२/२००७ मधील तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र..केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६ दि. ३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ता.जि.अहमदनगर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतेही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व

परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

५. प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३२/२०२१/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. अहमदनगर

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र. आ-२५१८ 11 SEP 2024